“सहकारी सूतगिरण्यांना राष्ट्रीय सहकारी विकास निगमाच्या योजनेंतर्गत पुनर्वसन व विस्तारीकरण यासाठी मुदती कर्ज मंजुर करण्याबाबत.”
जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि.सांगली.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः रासविनि - ३२१७/प्र.क्र.३७/टेक्स-१ (अ)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर , २०१९

वाचा :-

१. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सूतगि ११९७/प्र.क्र.१९३/टेक्स १, दि.२४ मार्च, १९९९.
२. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सूतगि ११२०००/प्र.क्र.१२१/टेक्स १, दि.१७ नोव्हेंबर, २०००.
३. शासन पत्र समक्रमांक दि.२६ मे, २०१४.
४. रा.स.वि.नि. पत्र क्र.NCDC -२०-१/२०१३-Tex/४४७/SA२०३०७, दि.१४ मार्च, २०१३.
५. शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र. सूतगि १११२/प्र.क्र.५१/टेक्स-१ (ब), दि.३० मार्च, २०१३.
६. आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांचे पत्र क्र.कार्या ६ (१)/सूतगि/२४०२/२०१७, दि.२८.०३.२०१९.

प्रस्तावना :-

राज्याची मर्यादित साधनसामुग्री लक्षात घेता, सहकारी सूतगिरण्यांना त्यांच्या आधुनिकीकरण / विस्तारीकरण व पुनर्वसन करण्यासाठी तसेच प्रकल्प उभारणीसाठी अर्थसहाय्य करण्याच्या योजना राज्यात संदर्भ क्र.२ येथील दि.१७ नोव्हेंबर, २००० रोजीच्या शासन निर्णयान्वये लागू करण्यात आली आहे. या योजनेस अनुसरुन राष्ट्रीय सहकारी विकास निगमाने (रा.स.वि.नि.) सूतगिरण्यांचे पुनर्वसन / विस्तारीकरण व प्रकल्प उभारणीसाठी संदर्भ क्र.४ येथील पत्रान्वये जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि.सांगली या सूतगिरणीच्या रु.३३००.०० लक्ष प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावास रा.स.वि.नि. ने मान्यता दिली असून आकृतीबंधानुसार मुदत कर्ज रु.१३२०.०० लक्ष, शासकीय भागभांडवल रु.९९०.०० लक्ष, शासकीय अनुदान रु.४८८.८७ लक्ष व सभासद भागभांडवल रु.५०१.१३ लक्ष असे एकूण रु.३३००.०० लाखाचा प्रस्ताव रा.स.वि.नि. ने मंजूर केला आहे. त्यानुसार या सूतगिरणीस सन २०१९-२०या आर्थिक वर्षात रा.स.वि.नि. मुदती कर्ज रु.४८०.०० लक्ष उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि. सांगली या सूतगिरणीच्या रु.३३००.०० लक्ष प्रकल्प किंमतीच्या प्रस्तावास रा.स.वि.नि. ने मान्यता दिली असून आकृतीबंधानुसार मुदती कर्ज रु.१३२०.०० लक्ष, शासकीय भागभांडवल रु.९९०.०० लक्ष, शासकीय अनुदान रु.४८८.८७ लक्ष व सभासद भागभांडवल रु.५०१.१३ लक्ष असे एकूण रु.३३८०.०० लक्षचा प्रस्ताव रा.स.वि.नि. ने

मंजूर केला आहे. रा.स.वि.नि. ने पुनर्वसन/ विस्तारीकरण या योजनेंतर्गत सदर सहकारी सूतगिरणीस मंजूर केलेल्या मुदती कर्जाची रक्कम रु.४८०.०० लक्ष इतकी रक्कम रा.स.वि.नि. कर्ज म्हणून वितरीत करण्यास संदर्भ क्र.३ येथील दि.१७.११.२०००रोजीच्या शासन निर्णयातील अटी तसेच खालील अटींच्या अधिन राहून शासन मान्यता देत आहे.

२. संदर्भ क्र.१ येथील दि.२४ मार्च, १९९९ रोजीचे शासन निर्णय तसेच संदर्भ क्र.४ येथील रा.स.वि.नि. च्या पत्रांमध्ये नमूद केलेल्या अटी व शर्ती सदर सूतगिरणीस बंधनकारक राहतील. तसेच, मुदती कर्जासाठी शासनाने/रा.स.वि.नि. ने भविष्यात आणखी काही अटी व शर्ती निश्चित केल्यास, त्या सूतगिरणीस बंधनकारक राहतील, अशा अतिरिक्त अटी व शर्तींच्या अधीन राहून, सदर रक्कम मंजूर करण्यात येत आहे. शासनातर्फे देण्यात येणाऱ्या सदर मुदती कर्जाचा परतावा संबंधीत सूतगिरणीकडून शासनास विहित वेळेत व विहित मुदतीत प्रदान होईल यासंदर्भात आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी काटेकोर अंमलबजावणी करावी.

३. वरील मंजूर करण्यात आलेले रा.स.वि.नि. मुदती कर्ज सूतगिरणीने १० वर्षाच्या कालावधीमध्ये व्याजासह परत करावयाचे आहे. सूतगिरणीवर रा.स.वि.नि. च्या दि.१४ मार्च, २०१३ रोजीच्या पत्रातील अटी व शर्ती बंधनकारक राहतील. तसेच सूतगिरणीस सदर रा.स.वि.नि. मुदती कर्ज खालील अतिरिक्त अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहे :-

१) सूतगिरणीच्या कामकाजावर व प्रकल्प उभारणीवर लक्ष देऊन त्याबाबतच्या प्रगतीचा तिमाही अहवाल आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी विहित विवरणपत्रात शासनास सादर करावा.

२) प्रस्तुत शासन निर्णयाद्वारे वितरीत होणा-या रकमेच्या ५% इतक्या वैयक्तिक मत्तेचे तारण आयुक्त, वस्त्रोद्योग यांनी पुढील ३ महिन्यांत सूतगिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाकडून मिळवावे. जोपर्यंत असे वैयक्तिक तारण प्राप्त होणार नाही, तोपर्यंत प्रस्तुत वितरीत रक्कम गिरणीस खर्च करता येणार नाही. तसेच, तोपर्यंत या आदेशाद्वारे मंजूर केलेल्या रकमेवर सूतगिरणीस अधिकर्ष (overdraft) काढून रक्कम खर्च करता येणार नाही असे बंधन आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी संबंधित बँकेवर घालावे.

३) या आदेशानंतर प्रस्तुत सूतगिरणीच्या संचालक मंडळाची निवडणूक झाल्यास, नवनियुक्त संचालक मंडळाने शासकीय भाग भांडवलाच्या ५% इतके वैयक्तिक मालमत्तेचे तारण भरल्याशिवाय नवीन संचालक मंडळ अस्तित्वात येणार नाही. पुर्वीच्या संचालक मंडळाने काही गैरव्यवहार केला नसेल किंवा त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल झाला नसेल तरच नवनियुक्त संचालक मंडळाने असे तारण दिल्यानंतरच पूर्वीच्या संचालक मंडळाचे वैयक्तिक तारण मुक्त करण्यात येईल, अशी सुधारणा संस्थेच्या By - Laws मध्ये करण्याची कार्यवाही आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी करावी.

४) दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणे कर्ज परतफेड करण्याची जबाबदारी सूतगिरणीची / सूतगिरणीच्या संचालक मंडळाची राहील. याबाबत सूतगिरणीच्या संचालक मंडळाकडून आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी तसे बंधपत्र घ्यावे. आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी सूतगिरणीकडून देय वसुलीबाबत काटेकोरपणे कार्यवाही करावी. सूतगिरणीने / विद्यमान संचालक मंडळाने दिलेल्या शेडयुलप्रमाणे कर्ज परतफेड केली नाही तर सदर कर्ज घेतेवेळी कार्यरत असणाऱ्या / विद्यमान संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेतून कर्जाचा हप्ता वसूल करण्यात यावा.

५) सूतगिरणीच्या प्रकल्पास मान्यता दिल्यानंतर प्रकल्पाच्या Financial Closer चा पुरावा

शासनास सादर केल्याशिवाय शासनाचा हिस्सा देता येणार नाही. त्यामुळे त्याबाबतची खात्री आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी करुन घेऊन त्यानुसार कार्यवाही करावी.

६) सूतगिरणीकडे बँकेत जमा असलेल्या निधीचे नियोजन करुन कार्यक्षमतेने विनियोग करीत असल्याची खात्री आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी करावी.

७) सूतगिरणीने कर्जाची उचल करुन त्याचा विनियोग प्रकल्प उभारणीसाठी करुन प्रकल्प लवकर पूर्ण करावा याबाबत आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी नियंत्रण ठेवावे. सूतगिरणीस ज्या कारणासाठी कर्ज मंजूर करण्यात येणार आहे त्या कारणासाठीच सदर कर्जाचा विनियोग करण्याची जबाबदारी सूतगिरणीच्या विद्यमान संचालक मंडळाची राहील. जर सूतगिरणीने कर्जाचा विनियोग इतर कारणासाठी केल्यास सदर कर्जाची वसूली सदर कर्ज घेतेवेळी कार्यरत असणाऱ्या विद्यमान संचालक मंडळाच्या वैयक्तिक मालमत्तेतून करण्यात यावी.

८) प्रकल्प अहवालातील अनुज्ञेय तरतुदीपेक्षा त्या त्या बाबीवर होणारा जास्तीचा खर्च सूतगिरणी स्वनिधीतून करील या अटीवर मुदती कर्ज मंजूर करण्यात येत आहे. याबाबत आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी तशी कार्यवाही करावी.

९) सूतगिरणीच्या खरेदीबाबत खरेदीची रक्कम सूतगिरणीने पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे अदा करावी. निविदेमध्ये विवक्षित तरतूद असल्याशिवाय पुरवठादारास अग्रीम अदा करण्यात येऊ नये याबबात आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी खात्री करावी.

१०) सूतगिरणीस प्राप्त झालेल्या भागभांडवलाचा तसेच सूतगिरणीकडे शिल्लक असलेल्या रकमेचा सूतगिरणी योग्य प्रकारे विनियोग करते किंवा नाही याबाबत आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी नियंत्रण ठेवावे.

११) भांडवली वस्तु खरेदी करण्यापूर्वी यापूर्वी खरेदी केलेल्या अशा वस्तुंची यथास्थित नोंद सूतगिरणीने Dead Stock रजिस्टर मध्ये घेतली असल्याची खात्री आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी करावी. तसेच खरेदी केलेल्या वस्तू प्रत्यक्ष प्राप्त झाल्यानंतरच संबंधितांना प्रस्तुत सूतगिरणी देयक अदा करील याबाबत आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी नियंत्रण ठेवावे.

१२) सूतगिरणीची उभारणी विहित कालमर्यादेत पूर्ण करावी.

४. वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ सोबतच्या परिशिष्ठातील अ. क्र. ९ येथील "५५ कर्जे व आगाऊ रकमा " या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले आहे. सदर परिपत्रकातील अ. क्र.५, ६, ७, ८, ९, १०, ११, १३ व १६ मधील तरतूदी या प्रकरणी लागू होत नाहीत तर अ.क्र.१२, १४व १५ मधील तरतूदी या प्रकरणी लागू असून सदर तरतुदींची पूर्तता खालीलप्रमाणे होत आहे.

अ.क्र.१२) बांधकाम विषयक प्रस्तावासंदर्भात प्रशासकीय / तांत्रिक मान्यता :- सूतगिरणीच्या स्थापत्य बांधकामाच्या निविदांना मंजूरी देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची मान्यता घेऊनच सूतगिरणीने बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे.

अ.क्र.१४) खरेदी प्रक्रिया :- खरेदी विषयक प्रक्रिया अद्यावत शासन निर्णय क्र. भांखस २०१४/ प्र.क्र.८२/ भाग-III/उद्योग-४, दि.०१ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार करण्यात यावी .

अ.क्र.१५) संक्षिप्त देयक :- सदर लेखाशीर्षाखाली कोणतेही संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

तसेच वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ सोबतच्या परिशिष्ठातील अ. क्र. ९ येथील “५५ कर्जे व आगाऊ रकमा ” या बाबीखालील अटींची पूर्तता सदर प्रकरणी होत आहे.

५. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दि.१० मे, २०१६ मधील परिच्छेद- अ नुसार प्रस्तुत प्रकरणाची माहिती खालीलप्रमाणे आहे :-

१) विभागास प्रदान वित्तीय अधिकार :- वित्त विभाग, परिपत्रक क्र. अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ अन्वये “५५ कर्जे व आगाऊ रकमा ” या बाबीखालील खर्च करण्यास विभागास अधिकार प्राप्त झाले असून सदर परिपत्रकातील तपासणी सूचीप्रमाणे सर्व बाबींची सदर प्रकरणी पूर्तता होत आहे.

२) मंजूर निधी :- "सन २०१९-२० मध्ये सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण याकरीता रा.स.वि.नि. पुरस्कृत कर्ज या योजनेखाली मागणी क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे, (०४) सहकारी सूत गिरण्या, (०४) (०८) सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे(रा.स.वि.मं. पुरस्कृत) कार्यक्रम (६४२५ ०५६५) “५५ - कर्जे व आगाऊ रकमा” या लेखाशीर्षाखाली रु.८००.०० लक्ष इतकी तरतूद मंजूर करण्यात आली असून वित्त विभागाच्या दि.०८.०७.२०१९ च्या परिपत्रकानुसार ६०% निधी (रु.४८०.०० लक्ष) खर्च करण्यास परवानगी देण्यात आली आहे. या निधीपैकी अद्याप काहीही रक्कम खर्च झालेली नाही.

३) मागील ३ महिन्यांपूर्वी दिलेल्या अनुदानापैकी ७५% किंवा अधिक निधी खर्च झाला आहे :- सदर सूतगिरणीस दि.२८.०३.२०१९ पर्यंत प्राप्त रकमेपैकी रु.१७७२.२९ लक्ष म्हणजेच ७५% रक्कम मंजूर करण्यात आलेल्या शासकीय भागभांडवल प्रकल्पावर खर्च झाला आहे.

४) ज्या लेखाशीर्षाखाली अनुदान वितरीत करण्यांत येत आहे, त्या लेखाशीर्षांतर्गत १ वर्षापूर्वीचे संक्षिप्त देयक प्रलंबित नाही :- या योजनेखाली नमूद केलेल्या लेखाशिर्षाखाली १ वर्ष जुने संक्षिप्त देयक प्रलंबित नाही.

५) स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान देतांना त्यांचेकडून राज्य शासनास येणे नाही किंवा येणे रक्कम समायोजित करण्यांत आली आहे :- लागू नाही.

६) वैयक्तिक लाभार्थीचे देयक सादर करतांना यादीसह व शक्यतो आधार क्रमांकासह सादर करावे :- लागू नाही.

७) बांधकामविषयक प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देतांना सक्षम अधिकाऱ्याची मान्यता घेतल्याचा उल्लेख आदेशात असावा :- सूतगिरणीच्या स्थापत्य बांधकामाच्या निविदांना मंजूरी देण्यासाठी राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीची मान्यता घेऊनच सूत गिरणीने बांधकाम व यंत्रसामुग्री खरेदी करणे बंधनकारक आहे.

८) अधिनस्त कार्यालयांना खरेदी करण्यासाठी प्राधिकृत करण्याचा शासन निर्णय निर्गमित करण्यापूर्वी अशा खरेदीसाठी रीतसर प्रशासकीय मान्यतेचे आदेश काढावेत :- सहकारी सूतगिरण्यांच्या यंत्रसामुग्री खरेदीबाबत राज्यस्तरीय समितीची मान्यता घेण्यात येते.

९) खरेदी विषयक प्रक्रिया संबंधित अद्यावत शासन आदेशानुसार करावी व तसा उल्लेख प्रशासकीय मान्यतेत असावा:- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

१०) साहित्य खरेदीची रक्कम पुरवठादाराच्या नावे ECS द्वारे आहरीत करावी :- याबाबतचा उल्लेख शासन निर्णयात करण्यात आला आहे.

६. वित्त विभाग, परिपत्रक क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.३१/कोषा.प्रशा.५, दि.१० मे, २०१६ मधील परिच्छेद- ब (२) येथे नमूद केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणास वित्त विभागाची मान्यता घेण्यात आली आहे. तसेच या परिपत्रकातील परिच्छेद-ब (३) नुसार, वित्त विभाग परिपत्रक क्र. अर्थसं- २०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९ सोबतच्या परिशिष्टातील अ.क्र.९ संदर्भातील तपासणी सुचीमधील असलेल्या मुद्दयांची पूर्तता या प्रकरणी होत आहे.

७. वित्त विभागाचे पत्र क्र.शादिक २०१५/प्र. क्र.९१/ऋहक, दि.०३.११.२०१५ मध्ये रोजीच्या पत्रास अनुसरुन या सूतगिरणीस या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या रु.४८०.००लक्ष इतक्या मुदती कर्जाच्या परतफेडीचे हप्ते / हप्त्याची रक्कम / हप्त्याचा कालावधी / सवलतीचा कालावधी पुढीलप्रमाणे राहील.

१. या सूतगिरणीने रा.स.वि.नि. मुदती कर्ज १० वर्षाच्या कालावधीमध्ये व्याजासह परतफेड करावी.

२. या १० वर्षामध्ये १ वर्ष सवलतीचा कालावधी (moratoerium period)आहे.

३. सदर कर्जावरील व्याजाचा दर १३% राहील.

४. प्रस्तूत कर्जाचा हप्ता मुदतीत न भरल्यास एक टक्का जास्त दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. तसेच हप्ता थकल्यास रु.२.५०% दराने दंडनीय व्याज आकारण्यात येईल. तसेच रा.स.वि.नि. ने व्याज दरामध्ये बदल केल्यास तो सुधारित व्याज दर सदर सुतगिरणीवर बंधनकारक राहील.

५. प्रस्तूत कर्जाच्या परतफेडीचे परिशिष्ट (Repayment Schedule) सोबत जोडले आहे.

८. या शासन निर्णयाद्वारे रा.स.वि.नि. योजनेंतर्गत जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि. सांगली या सूतगिरणीस मंजूर करण्यात आलेली रु.४८०.०० लक्ष इतकी रक्कम दि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा - इस्लामपूर (शहर), या बँकेच्या खाते क्र.०८९०५०८००००१५१ (IFSC Code - IBKL0487SDC) मध्ये RTGS द्वारे जमा करावी. सूतगिरण्यांनी प्रकल्प पूर्ण करण्यासाठी, कराव्या लागणाऱ्या खर्चासंदर्भात शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग क्र.सूतगि-१२००/११७१३/प्र.क्र.४२६/टेक्स-१(अ), दि.१५.०६.२००६ अन्वये स्थापन केलेल्या संबंधीत सनियंत्रण समित्यांची मान्यता घ्यावी. सूतगिरणीच्या संचालक मंडळाने सूतगिरणीच्या खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

९. पुनर्वसन / विस्तारीकरण केल्यानंतर सूतगिरणी वर्धनक्षमतेने चालेल व सूतगिरणीमार्फत राज्य शासनाच्या अर्थसहाय्याची परतफेड विहित वेळेत होईल यासाठी आवश्यक असलेली सर्व दक्षता आयुक्त, वस्त्रोद्योग, नागपूर यांनी घ्यावी. रा.स.वि.नि. च्या पुनर्वसन / विस्तारीकरण योजनेंतर्गत या सूतगिरण्यांना मिळालेले अर्थसहाय्य संबंधित प्रकल्प पूर्ण करण्यासाठीच उपयोगात आणणे संस्थेवर बंधनकारक राहील. या अर्थसहाय्याचा दुरुपयोग केल्यास संस्थेच्या संचालक मंडळावर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल व संस्थेला दिलेले अर्थसहाय्य एकरकमी वसूल करण्यात येईल. तसेच, अशा प्रकरणी संबंधीत संचालक मंडळास व्यक्तिश: जबाबदार धरण्यात येईल. त्यामुळे सूतगिरणीच्या संचालक मंडळाने सूतगिरणीच्या

खर्चावर कडक नियंत्रण ठेवावे व अनावश्यक खर्च टाळावा.

१०. जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्मालपूर, जि. सांगली या सूतगिरणीस या शासन निर्णयाद्वारे मंजूर करण्यात आलेल्या रा.स.वि.नि. मुदती कर्ज रु.४८०.००लक्ष इतकी रक्कम सहकारी सूतगिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण याकरीता मागणी क्र.व्ही-५, लेखाशीर्ष ६४२५ सहकारासाठी कर्जे, (०४) सहकारी सूतगिरण्या, (०४) (०८) सहकारी सूत गिरण्यांचे आधुनिकीकरण / विस्तारीकरण - सहकारी सूत गिरण्यांना कर्जे (रा.स.वि.म. पुरस्कृत) कार्यक्रम (६४२५ ०५६५), ५५ - कर्जे व आगाऊ रकमा " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध झालेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

११. या शासन निर्णयाद्वारे रा.स.वि.नि. योजनेंतर्गत जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि. सांगली या सूतगिरणीस मंजूर करण्यात आलेली रु.४८०.०० लक्ष इतक्या मुदती कर्जाची रक्कम दि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., शाखा - इस्लामपूर (शहर) या बँकेचे खाते क्र.०८९०५०८००००१५१ (IFSC Code - IBKL0487SDC) मध्ये RTGS द्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करण्याकरीता श्री.र. ग. बोड्डू, कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२ यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच, श्री. ब. बा. चव्हाण, सह सचिव (वस्त्रोद्योग), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२ यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्मालपूर, जि. सांगली (Jay Maharashtra Magaswargiya Sahakari Soot Girni Ltd., Islampur, Dist. Sangali) या सूतगिरणीच्या दि सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., इस्लामपूर, शाखा- इस्लामपूर (शहर), (The Sangali District Cooperative Bank Ltd., Sangali, Branch- Islampur City) येथील खाते क्र.०८९०५०८००००१५१ (IFSC Code - IBKL0487SDC) मध्ये RTGS द्वारे सदर रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

१२. हा शासन निर्णय, वित्त विभागाचे अनौपचारिक संदर्भ क्र. -३७९/२०१९/व्यय-२, दि.२३.०८.२०१९ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९१८२०१९२१४१०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vishal Vishvas Madane

Digitally signed by Vishal Vishvas Madane
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Co Operation Marketing and Textile Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bb0ed28a897fc87f69fe8807b3d9428966ce3233edb83a20c38834c19f2e3793, serialNumber=cb16db1cc002e115b709a8ca348a6483883493aaf53b7be25836cda1b57ff2dc, cn=Vishal Vishvas Madane
Date: 2019.09.19 16:18:57 +05'30'

(विशाल मदने)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.

२. महालेखापाल, (लेखापरिक्षा) महाराष्ट्र-१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.

३. प्रधान सचिव (वस्त्रोद्योग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-३२.

४. कार्यासन अधिकारी (रोखशाखा), सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ (४ प्रती).
५. कार्यासन अधिकारी, १६-सी, १७-सी, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,मंत्रालय, मुंबई-३२.
६. वित्त विभाग, व्यय-२ / अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई-३२.
७. नियोजन विभाग, कार्यासन-१४३१, मंत्रालय, मुंबई-३२.
८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. आयुक्त, वस्त्रोद्योग,महाराष्ट्र राज्य, नागपूर.
१०. प्रादेशिक उपआयुक्त, वस्त्रोद्योग, सोलापूर.
११. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सांगली.
१२. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
१३. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१४. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई (२ प्रती).
१५. व्यवस्थापक, आय.डी.बी.आय. बँक, शाखा इचलजकरंजी, जि. कोल्हापूर.
१६. महाराष्ट्र राज्य सहकारी वस्त्रोद्योग महासंघ मर्यादित, वकील हाऊस, मुंबई-१.
१७. अध्यक्ष, जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्मालपूर, जि. सांगली.
१८. निवड नस्ती (टेक्स १ अ / ब).

शासन निर्णय क्रमांकः रासविनि - ३२१७/प्र.क्र.३७/टेक्स-१ (अ),
दि. १८.०९.२०१९ चे सहपत्र

कर्जाच्या परतफेडीचे परिशिष्ट (Repayment Schedule)
जय महाराष्ट्र मागासवर्गीय सहकारी सूतगिरणी मर्या., इस्लामपूर, जि. सांगली.

(रु. लाखात)

मंजूर रक्कम	हप्ता	हप्ता दिनांक	परतफेडीचे वेळापत्रक		
४८०.००			मुद्दल	व्याज	एकूण
	१	३१.१२.२०१९	०.००	६२.४०	६२.४०
	२	३१.१२.२०२०	५३.३३	६२.४०	११५.७३
	३	३१.१२.२०२१	५३.३३	५५.४६	१०८.७९
	४	३१.१२.२०२२	५३.३३	४८.५३	१०१.८६
	५	३१.१२.२०२३	५३.३३	४१.६०	९४.९३
	६	३१.१२.२०२४	५३.३३	३४.६६	८७.९९
	७	३१.१२.२०२५	५३.३३	२७.७३	८१.०६
	८	३१.१२.२०२६	५३.३३	२०.८०	७४.१३
	९	३१.१२.२०२७	५३.३३	१३.८६	६७.१९
	१०	३१.१२.२०२८	५३.३६	६.९४	६०.३०
		एकूण	**४८०.००**	**३७४.३८**	**८५४.३८**